## नियमित दिवाणी दावा क्र. १०४/२०१५ मधील नि. ७५ वरील आदेश

**सीएनआर नं.MHAH230000251215**

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्र.८ दि.१२/०८/२०२२ रोजी मयत झाले असून तिचे वारस रेकॉर्डवर घेण्यास ७२६ दिवसांचा उशिर झालेला आहे. सदर मयत प्रतिवादी नं.८ चे कायदेशिर वारस मुदतीमध्ये रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते, परंतु वादींना मयताबाबतचे कागदपत्र वेळेत उपलब्ध न झाल्याने मयत प्रतिवादी नं.८ चे वारस मुदतीमध्ये रेकॉर्डवर घेता आले नाहीत. सदरचा झालेला उशिर उचित कारणामुळे झालेला आहे. दावा स्थावर मिळकतीसंदर्भात आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी प्रतिवादी क्र.८ चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ होवून मिळणे गरजेचे आहे. झालेला उशिर जाणिवपुर्वक केलेला नाही. अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे.

३. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवुन अर्जास हरकत घेतली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. ८ मारुती नारायण शेलार हे दिनांक १२/०८/२०२२ रोजी बेलवंडी बु., ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथे मयत झाले आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. ८ मयत झाल्याबाबत दि.०७/०८/२०२४ रोजी त्याचे मृत्यु प्रमाणपत्र प्रस्तुतच्या अर्जासोबत जवळपास तेवीस महिन्यांच्या विलंबाने दाखल केलेले आहे. तसेच प्रतिवादी यांनी दिलेले म्हणणे पाहता, प्रतिवादी क्र. ८ हे मयत झाल्याबाबत अभिलेखावर वाद नाही. प्रस्तुत दावा कब्जा मिळणेसाठी, मोजणी व निरंतर

ताकीदीचे मनाईहुकुमासाठी दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ८ चे वारस दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक असल्याने प्रतिवादी क्र.८ चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ होणे न्यायोचित ठरणार आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

अर्ज नि.७५ प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/– कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2024.12.13 10:54:42 +0530

श्रीगोंदा.

दिनांक १२/१२/२०२४.

**( एस.पी.केकान )**

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

श्रीगोंदा, जि. अहमदनगर.